| | |
|---|---|
| MHTH120098332023 | खटला दाखल तारीख : ०४/०७/२०२३<br>खटला नोंद तारीख : ०४/०७/२०२३<br>निकालाची तारीख : २०/०८/२०२५<br>खटल्याचा कालावधी : ०२ व.०१ म. १६दि. |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ४ थे न्यायालय, बेलापुर, नवी मुंबई यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी – श्रीमती व्ही.डी. साळवे)**

**दि.२० ऑगस्ट, २०२५ रोजी घोषित**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७४८७/२०२३** **निशाणी क्र– २७**

**( पोलिस ठाणे एनआयआर सागरी येथील गुन्हा नोंद क्र. २७०/२०२२, भारतीय दंड विधान संहितेचे कलम १४३, ३२३, ५०६ अन्वये )**

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी पक्ष** | | महाराष्ट्र शासन<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>एन.आर.आय. सागरी पोलिस स्टेशन,<br>नवी मुंबई |
| **फिर्यादीतर्फे विधिज्ञ** | | श्री. गायकवाड |
| **आरोपी क्र.१** | | **रोहित अविनाश पाटील**<br>वय – ३३ वर्षे,<br>रा. – घर क्र.२०१, बेलापूर गाव,<br>नवी मुंबई, ता. जि. ठाणे |
| **आरोपी क्र.२** | | **मोहमद हबीब मोहमद हनिफ कुरेश**<br>वय – २३ वर्षे,<br>रा. – पंचशिलनगर क्र.२, सेक्टर–२०,<br>बेलापूर, नवी मुंबई. |

| | | |
|---|---|---|
| **आरोपी क्र.३** | | **अल्ताफ सलीम खान**<br>वय – २० वर्षे,<br>रा. – घर क्र.४, बालाजी भवन, मराठी शाळेजवळ,<br>सेक्टर–२०, बेलापूर, नवी मुंबई. |
| **आरोपी क्र.४** | | **सुरजित अमरसिंग**<br>वय – २० वर्षे,<br>रा. – शहाबाज गाव, गावदेवी मंदीराजवळ,<br>सेक्टर–१९, बेलापूर, नवी मुंबई. |
| **आरोपी क्र.५** | | **रोहीत लहु गायकर**<br>वय – २६ वर्षे,<br>रा. – केळावे गाव, सुधागड शाळेचे पाठीमागे,<br>ता. पनवले, जि. रायगड. |
| **आरोपीतर्फे विधिज्ञ** | | वसीम शेख |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०७/११/२०२२ |
| प्रथम खबर अहवालाचा दिनांक | १२/११/२०२२ |
| दोषारोपपत्र/फिर्याद दाखल दिनांक | ०४/०७/२०२३ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०५/०८/२०२५ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | १२/०८/२०२५ |
| न्यायनिर्णयास राखून ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २०/०८/२०२५ |
| शिक्षेच्या आदेशाचा दिनांक, जर असल्यास | – |

<u>आरोपीची सविस्तर माहिती</u>

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | देण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता, १९७३ चे कलम ४२८ नुसार खटल्याचे दरम्यान अटकेतील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **रोहित अविनाश पाटील** | निरंक | निरंक | भारतीय दंड विधान संहितेचे कलम १४३, ३२३, ५०६ अन्वये | निर्दोष | – | निरंक |
| २. | **मोहमद हबीब मोहमद हनिफ कुरेश** | निरंक | निरंक | | निर्दोष | – | निरंक |
| ३. | **अल्ताफ सलीम खान** | निरंक | निरंक | | निर्दोष | – | निरंक |
| ४. | **सुरजित अमरसिंग** | निरंक | निरंक | | निर्दोष | – | निरंक |
| ५. | **रोहीत लहु गायकर** | निरंक | निरंक | | निर्दोष | – | निरंक |

## <u>न्यायनिर्णय</u>

## (पारीत दि.२०/०८/२०२५)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम १४३, ३२३, ५०६ अन्वये दोषारोप ठेवुन चालविण्यात आला.

**<u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की,</u>**

**०२.** दि.१२/११/२०२२ रोजी प्रथम खबर देणार श्री. योगेश पोपट माने यांनी पोलीस स्टेशन, एन.आर.आय. सागरी येथे प्रथम खबर दिली की, दि.०७/११/२०२२ रोजी ०९.३० वाजताचे दरम्यान श्रीनाथ डेअरी, श्रीराम मंदीराजवळ, बेलापूर तलावासमोर, सेक्टर–२०, बेलापूर, नवी मुंबई या ठिकाणी दुधाचा टँकर घेवून दुध टाकण्यासाठी आले. त्याचे मदतनीस राजा यादव व उमाशंकर यादव खाली उतरले. त्यावेळी तेथे यातील आरोपीत आले व यातील फिर्यादी व राजा यादव तसेच उमारशंकर यादव यांना ठोशा–बुक्क्यांनी मारहाण करुन फिर्यादी व फिर्यादीचे मालक ओंकार गावडे यांना जर बेलापूरात कोणत्याही डेअरीला दुध घातले तर सोडणार नाही अशी धमकी दिली. म्हणुन फिर्यादीने आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली.

**०३.** फिर्यादीने दिलेल्या फिर्यादवरुन पोलीस स्टेशन, एन.आर.आय. सागरी येथे आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान १४३, ३२३ व ५०६ अन्वये गुन्हा क्र.२७०/२०२२ नोंदविण्यात आला. घटनेचा पुढील तपास पोलिस उप निरीक्षक अंकुर शेलार यांच्याकडे सोपविण्यात आला. त्यानी फिर्यादीचा जबाब नोंदविला, तपासकामी घटनास्थळ पंचनामा व साक्षीदारांचे टिपण तपासकामी प्राप्त केले, गुन्हाच्या संदर्भातील कागदपत्र गोळा केले व तपासाअंती आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम १४३, ३२३, ५०६ नुसार या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम १४३, ३२३, ५०६ अन्वये निशाणी

क्रमांक १६ वर दोषारोप नोंदवुन त्यातील मजकुर आरोपीतांस त्यांचे मातृभाषेत समजावुन सांगीतला. आरोपीतांनी गुन्हा नाकबुल केला व खटला चालविण्याची विनंती केली.

**०५.** अभियोग पक्षाच्या पुराव्यावरुन आरोपींविरुध्द पुरावा न आल्याचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये आरोपीतांचे जबाब नोंदविण्यात आले नाहीत. सरकापक्षातर्फे सरकारी वकील श्री. गायकवाड व आरोपींचे वकील वसीम शेख यांचा युक्तीवाद ऐकला.

**०६.** अभिलेखावरील पुरावा पाहता आणि दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला असता खालील मुद्दे माझे विचारार्थ आले असुन त्यावरील निष्कर्ष व कारणे खालीलप्रमाणे देण्यात आलीः–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीतांनी दि.१२/११/२०२२ रोजी ०९.३० वाजताचे दरम्यान श्रीनाथ डेअरी, श्रीराम मंदीराजवळ, बेलापूर तलावासमोर, सेक्टर–२०, बेलापूर, नवी मुंबई या ठिकाणी बेकायदेशीर जमावाचे घटक होवून जमावाचे समान उद्दीष्ट फिर्यादी व साक्षीदार नामे राजा यादव व उमाशंकर यादव यांना मारहाण करणे असे होते व त्याद्वारे भा.द.वि. कलम १४३ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| २. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीतांनी वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी बेकायदेशीर जमावाचे घटक होवून फिर्यादी व वर नमुद साक्षीदार यांना ठोशा–बुक्क्यांनी मारहाण करुन केली व त्याव्दारे भारतीय दंड विधानाचे कलम ३२३ अन्वये गुन्हा केला? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीतांनी वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी बेकायदेशीर जमावाचे घटक होवून फिर्यादी व फिर्यादीचे मालक ओंकार गावडे यांना धमकी देवून फौजदारीपात्र धाकधपटशा केली व त्याव्दारे भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम ५०६ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | आरोपीतांची निर्दोष मुक्तता करण्यात येते |

## कारणमिमांसा

**अ. अभियोग पक्ष :–**

| क्र. | नाव/ | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस, तज्ञ, वैद्यकीय, पंच व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| १. | योगेश पोपट माने | २४ | फिर्यादी |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर :– निरंक**

**क. न्यायालया कडून साक्षीदार, जर असेल तर :– निरंक**

**फिर्यादीपक्ष/आरोपी पक्ष/ न्यायालयातील निशाणी क्रमांकांची यादी**

**अ. फिर्यादीपक्ष :–**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | २३ | तडजोड पुरसिस |

**ब.बचाव पक्ष :–**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालय :–**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | दोषारोप | १६ |

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीताः–</u>**

**०७.** सरकार पक्षाने आरोपींविरुध्द दोषारोप सिद्व करण्यासाठी केवळ एक साक्षीदार तपासला आहे. सा.क्र.१ फिर्यादी योगेश पोपट माने यांनी असे कथन केले की, सन २०२२ साली काय घडले हे त्यांना आता आठवत नाही. घटनेच्या दिवशी काय घडले हे त्यांना आठवत नाही. त्याला आरोपीतांनी मारहाण केली असे काही घडले नाही. सदर साक्षीदार अभियोग पक्षाच्या खटल्यास अनुसरुन साक्ष देत नसल्याने सरकारी वकीलांनी उलटतपास घेवून फिर्यादीस उत्तरसुचक प्रश्न विचारले परंतु फिर्यादीने सदर प्रश्नांना स्पष्टपणे नाकारले. आरोपीच्या वकीलांनी घेतलेल्या उलटतपासात साक्षीदार क्र.१ फिर्यादी याने आरोपींसोबत प्रकरण आपसात मिटल्याचे मान्य केले व त्याबाबतची तडजोड पुरशीस निशाणी २३ वर दाखल केलेली आहे.

**०८.** प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी हा घटनेचा महत्वाचा साक्षीदार आहे. त्याने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. तसेच उलटतपासामध्ये आरोपींसोबत तडजोड झाल्याचे मान्य केले व तशी तडजोड पुरशीर अभिलेखावर दाखल केली आहे. त्यामुळे फिर्यादी व आरोपींची नि.क्र २३ नुसार आपसात तडजोड झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आरोपीतांनी गैरकायदद्याची मंडळी जमा करुन फिर्यादी व साक्षीदार यांना ठोशा–बुक्क्यांनी मारहाण करुन फियार्दी व फिर्यादीचे मालक

ओंकार गावडे यांना धमकी देवून फौजदारीपात्र धाकधपटशा केल्याचे सिध्द होत नाही. म्हणून अभियोगपक्ष सबळ पुराव्या अभावी आरोपींविरुध्द दोषारोप सिद्ध करु शकलेला नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर 'नकारार्थी' देण्यात येते.

**<u>मुद्दा क्र. ४ करीताः–</u>**

**०९.** मुद्दा क्र.१ ते ३ च्या नकारार्थी निष्कर्षावरुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. त्याचप्रमाणे या खटल्याचे अपील झाल्यास आरोपीतांची उपस्थिती मा. वरिष्ठ न्यायालयात राखण्याकरीता त्यांचे कडुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे जामीन बंधपत्र घेणे योग्य होईल. करीता मुद्दा क्र.४ चे उत्तर मी खालील आदेशाप्रमाणे नोंदवित आहेः–

**<u>आदेश.</u>**

१. आरोपी क्र.१ ते ५ यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम १४३, ३२३, ५०६ अन्वयेच्या गुन्हयांतुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीतांचे जामीन व वैयक्तिक बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीतांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ प्रमाणे रु.७,५००/– चे जामीन व बंधपत्र द्यावे.

खुल्या न्यायालयात घोषीत.

सही/–

**(श्रीमती व्ही.डी. साळवे )**

न्यायदंडाधिकरी, प्रथम वर्ग,

(४ थे न्यायालय), बेलापुर, ठाणे.

स्थळ : बेलापुर

दिनांक : २०/०८/२०२५.